**महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि पदविका अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम १९९१ ची सुधारित नियमावली २०१४ यास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१४/प्र.क्र. ७३/एसडी-२,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२.
**दिनांक :- २८ ऑगस्ट, २०१४**

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसपीई-११८८/(२१६/८८) माशि-७, दि. २३ ऑक्टोबर १९८१ अधिनियम १९९१.
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्र. एसपीई-१०१२/(१०८/१२)/साशि-१, दि.३१ ऑक्टोबर, २०१३.
३) महाराष्ट्र राज्य शिक्षा परिषद यांचे पत्र क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/आ-१/२०१४/३१०२, दि. २ एप्रिल, २०१४.
४) महाराष्ट्र राज्य शिक्षा परिषद यांचे पत्र क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/आ-१/२०१४/५२१७,दि. २३ जून, २०१४.
५) शासन परिपत्रक क्र. एसपीई-२०१२/(प्र.क्र.११९/१२)/साशि-१, दि.१४ जानेवारी, २०१३.

<u>प्रस्तावना :-</u>

शासनाच्या वतीने, शासकीय परीक्षा मंडळ, पुणे यांचेमार्फत वर्षातून दोनवेळा वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा घेण्यात येतात. वाणिज्य पदविका व वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षांचे नियमन "वाणिज्य संस्था सूचना, १९६९ व जीसीडी/जीसीसी नियमावली, १९७० व १९८३" अन्वये करण्यात येत होती. राज्यात सध्या वाणिज्य पदविका/प्रमाणपत्र परीक्षा अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शासनमान्य संस्थांची संख्या सुमारे २२०० असून या संस्थांना शासनाकडून शासन मान्यता प्रदान केली जाते. या संस्थांकडून खऱ्या अर्थाने शैक्षणिक कार्य व्हावे या दृष्टीने या संस्थांचे नियमन करण्यासाठी माध्यमिक शाळा संहितेच्या धर्तीवर नियमावली तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला व नियमावली तयार करण्यासाठी प्रचलित नियम/सूचना इत्यादींची छाननी करुन नियमावलीचा मसुदा तयार करण्यासाठी शासनाने शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय क्र. बीजीई-

१०८६/(२२९) माशि-७, दि. २५ नोव्हेंबर, १९८६ अन्वये समिती नियुक्त केली होती. सदर समितीवर वाणिज्य शिक्षण संस्थांशी संबंधित व्यक्तीनाही प्रतिनिधीत्व देण्यात आलेले होते. या समितीने वाणिज्य शिक्षणाबाबत असलेली प्रचलित नियम, प्रशासकीय आदेश व सूचना यांची छाननी करुन "Draft Rules for Maharashtra Institute of Commerce Education (Typing Shorthand and Diploma Courses) Recognition and Conduct Rules १९९१" या नावाचा सुधारित नियमावलीचा मसुदा तयार केला. वाणिज्य शिक्षण संस्थांना (टंकलेखन, लघुलेखन आणि पदविका अभ्यासक्रम) मान्यता देणे, मान्यता काढुन घेणे, संस्थांच्या कामकाजांवर नियंत्रण ठेवणे, संस्थांची तपासणी करणे इत्यादीबाबत उपरोक्त समितीने तयार केलेल्या नियमावलीच्या मसुद्यात अल्पशा सुधारणा करुन "सुधारित नियमावली, १९९१" यास शासन निर्णय क्र. एसपीई-११८८/(२१६/८८) माशि-७, दि. २३ ऑक्टोबर १९९१ अन्वये शासन मान्यता दिलेली आहे. सद्यस्थितीत वाणिज्य पदविका व वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षांचे नियमन नियमावली १९९१ अन्वये करण्यात येते.

राज्यातील शासनमान्य टंकलेखन/लघुलेखन वाणिज्य संस्थामध्ये संगणक टायपिंग अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषेदेने शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावानुसार महाराष्ट्र शासन निर्णय क्र. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्र. एसपीई-१०१२/(१०८/१२)/साशि-१, दि. ३१ ऑक्टोबर, २०१३ नुसार शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयामुळे मुळच्या मान्यता व संचालन नियम १९९१ च्या नियमावलीत काही बदल व दुरुस्त्या करणे अपेक्षित होते त्यानुसार परिषदेने त्यामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या व बदल करुन मान्यता व संचालन नियम १९९१, सुधारित आवृत्ती २०१४ या नावाचा सुधारित नियमावलीचा मसुदा संदर्भ क्र. ४ च्या पत्राने शासनाकडे मान्यतेकरिता पाठविण्यात आला आहे. या सुधारित नियमावलीच्या मसुद्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासननिर्णय :</u>

वाणिज्य शिक्षण संस्थांना टंकलेखन, लघुलेखन, पदविका आणि संगणक टायपिंग अभ्यासक्रमास मान्यता देणे, मान्यता काढुन घेणे, संस्थांच्या कामकाजांवर नियंत्रण ठेवणे, संस्थांची तपासणी करणे इत्यादीबाबत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने तयार केलेल्या महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन, पदविका आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) सुधारित नियमावली, २०१४ च्या मसुद्यास सुधारणेसह शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी सदर "सुधारित नियमावली, २०१४" च्या पुरेशा प्रती छापुन घ्याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०८२८११३५२७४६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Prakash Krishnrao Thube

Digitally signed by Prakash Krishnrao Thube
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prakash Krishnrao Thube
Date: 2014.08.28 14:58:13 +05'30'

**(प्रकाश ठुबे)**

सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्य मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
३. मा. सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक.
४. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
१०. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
११. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
१२. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१३. सर्व शिक्षणाधिकारी माध्यमिक / प्राथमिक, जिल्हा परिषद.
१४. सर्व शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई, मुंबई.
१५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य टंकलेखन / लघुलेखन वाणिज्य संस्थाची संघटना ७९, केटीआय मार्केटयार्ड, अहमदनगर.
१६. सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
१७. सर्व अवरसचिव /कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती, एसडी-२.